




RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक निडर निर्भिड **जनसंचलन**

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com

Mob- 9822720784



आकर्षक व दर्जेदार स्कीमसह

युसीएन सिटी डिजिटल सेट-टॉप बॉक्स आपल्या घरी..



संपर्क :- 9129582958

पत्ता - शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स बुलडाणा अर्बन मुख्यालय समोर बुलडाणा



वर्ष ३ रे अंक : १६४ वा मंगळवार दि. १२ ऑगस्ट २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये


# MPDA चा गाजावाजा की आमदारावर थेट वार?

## बावनकुळेंचा टार्गेट कोण?....

वृत्तसंस्था /बुलढाणा

MPDA कायदा ज्याचा अर्थ महाराष्ट्र धोकादायक व्यक्ती प्रतिबंधक कायदा असा आहे, हा कायदा आता राज्यातील वाळूतस्करांवर लागू होणार आहे. त्यामुळे या कायद्याअंतर्गत तात्काळ कारवाया करा, असे स्पष्ट निर्देश राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकतेच बुलढाण्यात दिले होते. बावनकुळे यांच्याकडून बुलढाण्यात हा आदेश देण्यामागे अनेक तर्कवितर्क लढवले जात आहेत. बावनकुळेंचा निशाणा नेमका कुणावर, असा प्रश्न अनेकांना पडला आहे. बुलढाण्यात आले असता मंत्री बावनकुळे यांनी वाळूची अवैध वाहतूक व विक्री करणा-यांवर तात्काळ कठोर कारवाई करा. एव्हढेच नाही तर कोण्याही आमदार-खासदार लोकप्रतिनिधीचा जरी फोन आला तरी कुणाचेही ऐकू नका, असे कठोर निर्देश जिल्हाधिक-यांपासून ते महसूलच्या इतर अधिका-यांना दिले. त्यांच्या या वक्तव्याचे आता अनेक अर्थ काढले जात आहेत.थोडे इतिहासात जाऊन पाहिल्यास सुमारे १५ वर्षांपूर्वी बुलढाण्यात जिल्हा पोलिस अधीक्षक देशभ्रतार हे होते. त्या वेळी त्यांनी वाळूचे अवैधरित्या उत्खनन वाहतूक व गुंडगिरी केल्या प्रकरणी एका लोकप्रतिनिधींवर एमपीडीए कायद्याअंतर्गत कारवाई करावी, अशी शिफारस केली होती. त्या वेळी संबंधित लोकप्रतिनिधी महोदयांनी तत्कालीन गृहमंत्री आबा पाटील यांची सोबत असल्या कारणाने त्यांच्यावर कोणतीही कारवाई झाली नाही, तसेच तत्कालीन गृहमंत्र्यांनी संबंधित आमदारास वाचवले आहे, असा आरोप तेंव्हा देखील होत होता. ज्यांच्यावर बावनकुळे यांचा निशाणा आहे, त्या व्यक्तीचे भाजपच्या विद्यमान नेत्यांशी अगदी विळ्या-भोपळ्याचे सख्य आहे. सातत्याने भाजपच्या नेत्यांशी पंगे घेणे हे संबंधित आमदाराचे नित्याचेच बनले आहे. भाजप-शिवसेना हे मित्रपक्ष असून देखील सातत्याने आम्हाला संबंधित लोकप्रतिनिधी डावलतो आहे, असा आरोप भाजपचे नेते करीत असतात.या संपूर्ण स्थितीत असाही आरोप आहे की, संबंधित लोकप्रतिनिधी आणि त्यांचे काही सहकारी हे मोठ्या प्रमाणात वाळूचा अवैध उपसा करणे व वाळूची अवैधरित्या वाहतूक करणे असे प्रकार करीत आहेत. त्यासाठी अनेक प्रकारच्या तिकडमबाज्या केल्या जात असल्याचा आरोपही भाजप नेते व कार्यकर्त्यांचा आहे. या एकंदर परिस्थितीत आगामी काही




महिन्यांमध्ये जिल्हा परिषद आणि जिल्ह्यातील ब-याच नगरपालिका, पंचायत समित्यांची निवडणूक आहे. संबंधित लोकप्रतिनिधी हा बुलढाणा नगरपालिकेवर आपलाच झेंडा फडकावण्याचा प्रयत्न जोरदारपणे करीत आहेत. भाजपच्या अंतर्गत गोटात आगामी निवडणुका स्वबळावर लढण्याबाबत अत्यंत गांभीर्याने चर्चा सुरू आहे. त्यामुळे संबंधित लोकप्रतिनिधी हा भाजपवर सातत्याने दबाव आणण्याचा प्रयत्न करीत असल्याची खुमासदार चर्चा नागरिकांमध्ये होत आहे. बावनकुळे यांनी जे काही कठोर आदेश दिले आहेत, त्यातून संबंधित आमदारावर कुठेतरी शिकंजा कसण्यासाठी हा प्रयत्न असल्याचे बोलले जात आहे. कारण एमपीडीए नुसार कारवाई झाल्यास संबंधित आमदारावर कठोर कारवाई होईल व त्यातून भाजपला त्या आमदाराचा होणारा त्रास कमी होईल, असा होरा भाजप नेत्यांचा असावा. काहीही असले तरी संबंधित लोकप्रतिनिधीच्या मित्रपक्षांसाठी असलेल्या कुरापती कमी झाल्या नाही तर कुरापतींना उत्तर महाकुरापतींनीच दिले जाईल, असा प्रतीकात्मक इशारा या निमित्ताने भाजप देत तर नाही ना, अशी शंका या निमित्ताने उपस्थित होत आहे.

## बाप्पा खड्डेमय रस्त्यातून येतांना सांभाळून या.. नगर पालीकेला सद्बुद्धी द्या!

जनसंचलन/बुलढाणा

गणेशोत्सवाला काही दिवस उरले असताना बुलढाणा शहरातील रस्ते पावसामुळे खड्डेमय बनले आहेत. त्यामुळे गणेशभक्तांना खड्ड्यांतूनच वाट काढत लाडक्या बाप्पाला आणावे लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे नगरपालिकेने अंतर्गत रस्त्यांवरील खड्डे बुजवावे,अशी मागणी गणेशोत्सव मंडळांनी केली आहे. गणरायाच्या स्वागतासाठी घरगुती व सार्वजनिक मंडळांना वेध लागले आहेत. परंतु काही दिवसांपासून पडणाऱ्या पावसामुळे रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. त्यामुळे गणेशभक्तांसमोर नवी समस्या निर्माण झाली आहे. मात्र नगरपालिकेच्या उदासीनतेमुळे शहरातील आंतर रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. त्याचा फटका मूर्ती आणताना गणेश मंडळांना बसणार आहे. चिखली रोड, त्रिशरण चौक, कारंजा चौक, संगम चौक, जांभरूण



रोड, धाड नाका आदी अनेक ठिकाणच्या रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. पावसाने उघडीप दिल्यावर रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याची मागणी मंडळांनी केली आहे.

## चिखली तालुक्यातील ३१ गावांना अतिवृष्टीचा तडाखा!

जनसंचलन/बुलढाणा

मुसळधार पावसाने जिल्ह्यातील चिखली, सिंदखेड राजा, देऊळगाव राजा या भागात ९ व १० ऑगस्ट रोजी दाणादाण उडवली. त्यामुळे चिखली तालुक्यातील ३१ गावांना अति पावसाचा फटका बसला असून, २७६४ हेक्टर क्षेत्रावरील पिके बाधित झाले आहे.या नुकसानामध्ये सोयाबीन,मका आणि भाजीपाल्याचा समावेश आहे. गेले दोन दिवस सिंदखेड राजा, देऊळगाव राजा व चिखली तालुक्यात पावसाने थैमान घातले आहे. या पावसाने शेतीचे आणि पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे दिसून आले आहे. उभी पीकं आडवी झाली आहेत. तर काही पिकांवर रोगराईचा प्रादुर्भाव दिसून आला आहे. या आस्मानी संकटामुळे शेतकऱ्याचा हाता तोंडाशी आलेला घास हिरवला गेला आहे. बळीराजा पुन्हा एकदा संकटात सापडला आहे.

# ...पारंपरिक जल्लोष...

गुढीपाडव्याच्या निमित्ताने दरवर्षी मुंबई आणि उपनगरांमध्ये अनेक ठिकाणी शोभायात्रा काढल्या जातात. अनेक तरुण-तरुणी यात उत्साहाने सहभागी होतात. अशा यात्रांमधून आनंद तर मिळतोच शिवाय व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीतही त्या उपयोगी ठरतात. गिरगावमधल्या शोभायात्रेत नेहमी सहभागी होणारी अभिनेत्री कुंजिका काळविंट आपले अनुभव सांगत आहे. गुढीपाडवा आणि गिरगावातली शोभायात्रा यांचं नातं अतूट आहे. स्वामी विवेकानंद युवा प्रतिष्ठान आयोजित या शोभायात्रेत गिरगाव ध्वजपथकाचं स्थानदेखील खूप महत्वाचं आहे. या पथकात कार्यरत असणाऱ्या कुंजिका काळविंटने ङ्गमहाराष्ट्र टाइम्स श्रावणक्वीनफ्चा बहुमान मिळवला तर आहेच शिवाय नुकत्याच प्रदर्शित झालेल्या ङ्गएक निर्णय स्वतःचा स्वतःसाठीफया चित्रपटातून तिने सिनेसृष्टीत पदार्पण केलं. तिने या यात्रेबद्दलचे आपले अनुभव सांगितले. मी शाळेत असल्यापासून गिरगावातली शोभायात्रा बघत आले आहे. या शोभायात्रेची सुरुवात गिरगावातल्या फडके गणपती मंदिरापासून होते आणि या यात्रेच्या सुरुवातीलाच गिरगाव ध्वज पथक असतं. २००५ मध्ये दहावीची परीक्षा संपल्यावर मी

## संपादकीय लेख

त्यावर्षीच्या गुढीपाडव्याच्या शोभायात्रेत प्रथम सहभागी झाले. गिरगाव ध्वज पथकात सुरुवातीला मी ध्वज फडकवणं, त्याच्या फॉर्मेशन्स शिकले. त्यात सुरुवातीला आम्ही शून्य ते अकरा अशा स्टेप्स फॉर्म केल्या होत्या. तसंच तलवार चालवण्याचीदेखील एक स्टेप यात होती. मग नंतरच्या वर्षात मला गिरगावातल्या एका शाळेतल्या मुलींना ध्वज शिकवण्याची संधी मिळाली. त्यातून माझ्यातले नेतृत्वगुण विकसित झाले. दरवर्षी मी या पाडव्याच्या यात्रेची वाट पाहू लागले. आजही प्रत्येक वर्षी काहीतरी नवीन करण्याचा आमचा प्रयत्न असतो. पुढे मी ढोलदेखील वाजवायला शिकले. गिरगावातल्या प्रमुख ठिकाणी सर्वांसमोर आपली कला सादर करण्यातून खूप आनंद मिळतो. शिवाय हजारो लोक यात्रेत असतात. त्यांच्यासमोर आत्मविश्वासाने ध्वज फडकवणं, ढोल वाजवणं या कला सादर करण्यात एक अनोखा आनंद मिळतो. या यात्रेमुळे आणि विशेषतः गिरगाव ध्वज पथकामुळे आमचा खूप छान ग्रुप बनला आहे.



ङ्गमहाराष्ट्र टाइम्स श्रावणक्वीनफ झाल्यानंतरसुद्धा मी त्यानंतरच्या गुढीपाडवा यात्रेत सहभागी झाले होते. तेव्हा ङ्गश्रावणक्वीनफ या टॅगमुळे मला एक ओळख मिळाली होती. सर्व गिरगावकरांना त्याचा अभिमान वाटत होता. मी ङ्गश्रावणक्वीनफ बनल्यामुळे लोकांचा माझ्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला होता. गेल्या वर्षी ङ्गएक निर्णय स्वतःचा स्वतःसाठीफ या चित्रपटाचं शूटिंग आणि डबिंग सुरू होतं. त्यामुळे पथकात माझा सहभाग व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून जास्त होता. यावर्षीच्या यात्रेत गिरगाव ध्वज पथकात मी आहेच. यावर्षी आम्ही प्रथमच ङ्गबर्ची पथकफ सादर करत आहोत. त्यात मी आहे. शिवाय यंदा मी झांज सादर करणार आहे. त्यासाठी मी झांज शिकले. ही गिरगावातली यात्रा मला सुखावणारी आहे. यातलं गिरगाव ध्वज पथक हा माझ्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनला आहे. मला नऊवारी साडी खूप आवडते. या शोभायात्रेच्या निमित्ताने मी पारंपरिक पद्धतीची नऊवारी नेसते. दरवर्षीच्या यात्रेत वेगळ्या रंगाची नऊवारी नेसण्याकडे माझा कल असतो. शिवाय मला पारंपरिक दागिनेही आवडतात आणि आमच्या घरातली परंपरागत नथ मी आवर्जून या दिवशी घालते. ही यात्रा आणि ध्वज पथकाने माझ्या आयुष्याला वेगळं वळण दिलं आहे, हे नक्की.

# ग्रामस्तरीय मृद नमुने तपासणी प्रयोगशाळा उभारणीसाठी अर्ज आमंत्रित

जनसंचलन/बुलढाणा

राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत जमिन सुपिकता कार्यक्रम सन २०२५-२६ करिता मृद नमुन्यांची तपासणी ग्रामस्तरीय मृद नमुने तपासणी प्रयोगशाळांमार्फत करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय वार्षिक कृती आराखड्यानुसार राज्यात ४४४ नवीन प्रयोगशाळांना मंजुरी मिळाली असून, जिल्ह्यास १५ प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रयोगशाळा उभारणीसाठी इच्छुक लाभार्थ्यांनी १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत अर्ज सादर करावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार व्यक्ती, शेतकरी उत्पादक संस्था (), पीएसीएस, कृषी चिकित्सालये व कृषी व्यवसाय केंद्रे (), माजी सैनिक, बचत गट (), शेतकरी सहकारी संस्था, निविष्ठा विक्रेते तसेच शाळा/कॉलेजमधील युवक-युवती यांना प्रत्येकी १ लक्ष ५० हजार रुपये अर्थसहाय्य



दिले जाणार आहे. इच्छुक लाभार्थ्यांनी आपले अर्ज दिनांक १५ ऑगस्टपर्यंत कार्यालयीन वेळेत जैविक कीड नियंत्रण प्रयोगशाळा, बुलडाणा येथे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या नावे सादर करावेत. अधिक माहितीसाठी एस. एस. जाधव, उप कृषी अधिकारी (मो. ७०८३१८७०८२) यांच्याशी संपर्क साधावा. लक्षांकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास जिल्हास्तरीय निवड समितीमार्फत सोडत काढून अंतिम निवड करण्यात येईल. पात्रता : युवक/युवतीचे वय १८ ते २७ वर्षे, किमान १० वी (विज्ञान विषयासह) उत्तीर्ण, आधारकार्ड व पॅनकार्ड अनिवार्य, संगणक ज्ञान आवश्यक (- प्रमाणपत्र), स्वतःची किंवा किमान ४ वर्षे भाडेकरार असलेली इमारत.






The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# दलालांची गोष्ट म्हणजे केवळ स्टोरी, पुरावे असतील तर आयोगाकडे जा; फडणवीसांचा शरद पवारांना टोला...




**नागपूर :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ( शरद पवार गट) अध्यक्ष शरद पवार यांनी विधानसभा निवडणुकीपूर्वी दोन दलाल त्यांच्याकडे विजयाची हमी देणारा प्रस्ताव घेऊन आल्याचा दावा केल्यानंतर, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपुरात त्यावर तीव्र प्रतिक्रिया दिली. शरद पवारांच्या विधानाला फडणवीस यांनी स्टोरी असं संबोधलं आणि निवडणुकीवर प्रभाव टाकणाऱ्या अशा कथांना जनतेची फसवणूक ठरवले. फडणवीस म्हणाले, अशा प्रकारचे लोक मोठ्या नेत्यांकडे जातात, निवडणुकीवर प्रभाव टाकण्याचे आयडिया देतात. पण हे नेते पोलिसांकडे तक्रार करत नाहीत, ना निवडणूक आयोगाकडे तक्रार करतात. जर खरोखरच असा प्रकार झाला असेल, तर त्वरित तक्रार का केली नाही? याचा सरळ अर्थ असा होतो की, त्यांनी त्या ऑफरचा वापर करण्याचा विचार केला का? ते पुढे म्हणाले की, निवडणूक आयोगाने अनेक वेळा खुले आव्हान दिलं आहे की, कोणी हॅक करून दाखवावे. कोणीही ते करू शकलेले नाही. तुमच्याकडे कोणी असेल तर त्याला घेऊन जा आणि दाखवा. खोटी वक्तव्ये करून जनतेने दिलेल्या विजयाचा अपमान करणे थांबवा, असा फडणवीसांचा पवारांना सल्ला होता.शरद पवार काल नागपुरात म्हणाले होते की, विधानसभा निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर दोन दलाल त्यांच्या भेटीस आले होते. महाराष्ट्रातील २८८ पैकी १६० जागा जिंकण्याची हमी देत त्यांनी ऑफर दिली होती, असा पवारांचा दावा होता.ओबीसी प्रश्नावरही फडणवीसांनी पवारांवर टीका केली. ते म्हणाले की, निवडणुकीत धक्का बसल्यानंतर आता ओबीसीची आठवण येत आहे. ओबीसी समाजाला नेहमीच बाजूला करण्याचं काम त्यांनी केलं. जेव्हा ओबीसी आरक्षणावर संकट आलं, तेव्हा त्यांनी दुटप्पी भूमिका घेतली. हे समाजाने पाहिलं आहे. आता जमीन सरकू लागल्यावर ओबीसीचा आधार घ्यायचा प्रयत्न सुरू आहे. एकीकडे पवारांनी दलाल प्रकरण पुढे आणत सत्ताधाऱ्यांवर अप्रत्यक्ष हल्ला चढवला, तर दुसरीकडे फडणवीसांनी त्यावर थेट पलटवार करून पवारांच्याच भूमिकेवर प्रश्नचिन्ह उभं केलं आहे. राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या विविध आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. ओबीसी आरक्षण, ईव्हीएमवरील आरोप, तसेच निवडणुकीवर प्रभाव टाकण्याच्या कथित प्रयत्नांमुळे राजकीय चर्चा चांगल्याच रंगल्या आहेत.

## आम्हाला लोकसभेनंतरही ऑफर होती की; शरद पवारांनंतर संजय राऊतांनी फोडला मोठा बॉम्ब



**मुंबई :** देशाच्या राजकारणातील ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी धक्कादायक दावा केला होता. निवडणुकीआधी त्यांना दोन लोकं भेटलेली त्यांनी १६० जागा जिंकून देतो अशी ऑफर दिल्याचा दावा केलेला. राज्याच्या राजकारणामध्ये खळबळ उडाली होती, सत्ताधाऱ्यांनी हे सर्व फेटाळून लावलं आहे. मात्र अशातच ठाकरे गटाचे फायरब्रँड नेते संजय राऊत यांनीही एक बॉम्ब टाकला आहे. ज्यामध्ये शरद पवारांना भेटलेली लोक उद्धव ठाकरेंना भेटली असल्याचं ते म्हणाले. उद्धव ठाकरे आणि ऑफर देणाऱ्यांमध्ये नेमकी काय चर्चा झालेली याबाबत संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत सर्व काही सविस्तरपणे सांगितलं आहे. निवडणुकीसंदर्भात घोटाळे आहेत. मोदी, शहा आणि फडणवीस यांच्यासारखी लोकं निवडणूक पैसा आणि सत्तेच्या बळावर चोरतात आणि हायजॅक करतात. त्या पद्धतीचे एजंट त्यांनी निर्माण केले आहेत. शरद पवारांनी महत्त्वाचा विषय मांडला, निवडणुकीपूर्वी काही लोकं त्यांना भेटले. १६० जागी विजय प्राप्त करून देतो आम्हाला विशिष्ट रक्कम द्या, अशी त्यांची मागणी होती. उद्धव ठाकरेंनाही काही लोकं भेटले होते, ते लोकसभेला आणि विधानसभेलाही भेटले होते. आम्ही त्यांना सांगितलं की, आमचा लोकशाहीवर विश्वास आहे. उद्धव ठाकरे त्यांना म्हणाले की, देशातील वातावरण पाहता लोकसभा १०० टक्के आम्ही जिंकू,आम्ही महाराष्ट्रात विजय प्राप्त केला. आम्हाला घोटाळे करून निवडणुका जिंकायची गरज वाटत नसल्याचं संजय राऊत म्हणाले.ते लोक पुन्हा विधानसभेला आले. तेव्हा आम्ही सांगितलं की, लोकसभेला आम्हाला प्रचंड यश प्राप्त झालं आहे, विधानसभेतही आम्ही नक्की सत्तेत येऊ. तेव्हा त्या लोकांचं असं म्हणणं होतं की ६० ते ६५ अडचणीतल्या जागा सांगा ईव्हीएमच्या माध्यमातून विजयी करून देऊ. आम्हाला आवश्यकता वाटत नसल्याचं सांगितलं, त्यावर त्यांनी इतकं सांगितलं की जे समोर सरकारमध्ये आहेत त्यांनी अशा प्रकारची योजना मतदार याद्या आणि ईव्हीएमच्या माध्यमातून काम केलंय त्यामुळे तुमचं अपयश दिसतंय. आम्ही तुम्हाला मदत करू शकतो. तरीही आमचा विश्वास निवडणूक यंत्रणेवर, आयोग आणि लोकशाहीवर होता. दुर्दैवाने शरद पवार जे बोलत आहेत आणि उद्धव ठाकरे यांना भेटलेल्या लोकांच्या बोलण्यात तथ्य असावं असं दिसतंय असं संजय राऊत यांनी म्हटलं आहे.

## पालकांनी मुलांसमोर रडणं ठीक आहे की नाही?




प्रत्येक घरांची आपली अशी एक कहाणी असतेच. जगण्याच्या रेट्यात असे काही क्षण येतात जेव्हा प्रगल्भ पालकांनाही हळवं वाटून मुलांसमोर रडू येतं. मनातल्या भावनांचा कल्लोळ एवढा जबरदस्त असतो की त्या साचलेल्या भावना डोळ्यांतून वाहू लागतात. पालक असले म्हणून काय झालं, आईबाबा हाडामांसाची माणसंच असतात. त्यांच्या वेदना, दुःख आणि होणारा मानसिक त्रास त्यांच्या चेहऱ्यावर स्वच्छ दिसतो. मात्र मूल जेव्हा आईबाबांना रडताना बघतो तेव्हा त्याच्या बालमनात अनेक प्रश्न निर्माण होऊ शकतात. हे प्रश्न किंवा मुलांना आईबाबांची वाटणारी काळजी या गोष्टी मुलांच्या दृष्टीने धोकादायक आहेत की कसं? याविषयी पेरेंटिंग कोच वान्या त्यागी यांनी इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर केला आहे. पाहू या, त्या काय सल्ला देतात.पेरेंटिंग कोच वान्या त्यागी म्हणतात, तुमच्या मुलाला अचानक तुम्ही रडताना दिसलात तर तुम्ही शांत राहणे आणि त्याला प्रामाणिकपणे, पण सोप्या भाषेत समजावून सांगणे सर्वात महत्वाचे आहे. तुम्ही असे काहीतरी म्हणू शकता, ङ्गङ्घहो, मला सध्या थोडं दुःख होत आहे. सर्वांनाच कधी ना कधी असं वाटतं, आई, बाबा, अगदी आजीही. जेव्हा आपण दुःखी असतो तेव्हा कधीकधी आपल्याला रडावेसे वाटते, पण मी ठीक आहे.ङ्घङ्घअशा गोष्टींद्वारे मुलाला समजते की भावना सामान्य आहेत आणि त्या लपवण्याची गरज नाही. तो हे देखील शिकतो की दुःखी असूनही, एखादी व्यक्ती आपले काम करू शकते आणि परिस्थितीवर मात करू शकते.जेव्हा तुम्ही तुमच्या भावना लपवण्याऐवजी उघडपणे तुमच्या मुलाला व्यक्त करता तेव्हा तुम्ही त्याला भावनिक समज शिकवत असता. अ. मुलाला समजते की प्रत्येकाला कधी ना कधी दुःख होते. ब. त्याला समजते की त्याच्या भावना व्यक्त करणे ठीक आहे. क. त्याला हे देखील कळते की दुःखी झाल्यानंतरही माणूस मजबूत राहू शकतो.अ. मुलाला दोष देऊ नका - जर तुम्ही दुःखी असाल तर ते त्याच्यामुळे आहे असे दाखवू नका. ब. तुमच्या भावना लादू नका - तुमच्या भावनांचा भार तुमच्या मुलावर टाकू नका.अ. खोटे बोलू नका - रडताना तुम्ही ठीक आहात असे म्हणू नका.ब. नियंत्रणाबाहेर वागू नका - ओरडणे, वस्तू तोडणे किंवा खूप भावनिक होणे तुमच्या मुलाला घाबरवू शकते.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मिटलेलं पुस्तक





तिच्यात एवढा आत्मविश्वास कुणी निर्माण केला? अगदी चार भिंतीत वावरणारी लक्ष्मी आज मासिकाच्या मुखपृष्ठावर आपला फोटो छापून यावा म्हणून धडपडू लागलीय.

आजवर लक्ष्मीचं मन पुस्तकात पार गुंतून गेलेलं. अक्षरशः त्या अक्षरांच्या सान्निध्यात ती इतकी रममाण होऊन गेली की, तिला आजूबाजूचंही भान उरलं नाही. हे गेले काही दिवस असंच चाललेलं. ती आणि तिची पुस्तकं!

या पुस्तकांमध्ये सारखी भर पडत गेलेली. आठवडा किंवा महिन्याला रोज एक-दोन नवी पुस्तकं घरात यायचीच यायची आणि हिचं मन त्यात गुंतून जायचं. काही निवडक, आवडती म्हणजे अतिप्रिय पुस्तकं तर तिने वेगळीच बाजूला काढून ठेवलेली. पुन्हा पुन्हा वाचण्यासाठी.. नवीन पुस्तकं मिळेस्तोवर. या सा-या पुस्तकांचं श्रेय नारायणतिच्या पतीलाच तर जात होतं.

पण, हे पुस्तकात रमून जाणं, तासन्तास पुस्तक वाचता-वाचता आजूबाजूचं भान न राहणं यामुळे नारायणची चिडचिडही होऊ लागलेली, आतासं हे पुस्तकांचं वेड संपता संपेनासं झालेलं.

लक्ष्मी.. लक्ष्मीनारायणने हाका मारल्या, पण ना त्याच्या हाकेला काही उत्तर आलं ना तिने पुस्तकातून डोकं वर काढलं. अगं जेवायला तरी देशील का नाही तो वैतागला. त्याने तिच्या हातातील पुस्तकच ओढून घेतलं आणि ते फेकलंच बाजूला. अहो, अहो.. काय केलं हे? किती रमले होते मी. आता पानही दुमडता नाही आलं.. पुस्तक नीट मिटून तरी ठेवायचं ना, फेकलं का? तिची नाराजी. हे रोज रोज पुस्तकात रमणं पुरे झालं आता. जरा कामाचं पण बघा. भूक लागलीय.. असं म्हणून त्याने तिच्याकडे पाहिलं आणि तो चमकलाच. हे नऊवारी नवं कोरं लुगडं, केसाचा अंबाडा, डोळ्यांत काजळ रेखून ही नटूनथटून पुस्तक वाचत बसलेली. हे बघून त्याची नजर थोडी करडीच झाली. त्याची नजर एकवार तिने मांडून ठेवलेल्या ढीगभर पुस्तकांवर स्थिरावली. मनात आलं, ही पुस्तकं नाहीतरी आपणच आणून दिलीत हिला. पिंजून काढलीत सारी तिने ती. पुढे सरसावत त्याने एक-एक पुस्तक न्याहाळले. मुखपृष्ठ न्याहळतानाच लक्ष्मी पुढे आली. म्हणाली, मुखपृष्ठ पाहताय ना पुस्तकाचं. जेवायला दे.. भूक फार लागलीय. त्याचा स्वर करडाच काहीसा.

इयत्ता पाचवी शिक्षण असलेली लक्ष्मी जेव्हा घरात लग्न होऊन आली, तेव्हा बोलतानाही अडखळायची. उच्चार, स्वर खणखणीत व्हावे म्हणून सुरुवातीला एक-दोन आणून दिलेली पुस्तकं वाचता-वाचता हिने तर आता घरभर पुस्तकांचा ढिगारा करून ठेवलाय. त्याने पुस्तकं न्याहाळली, अगदी सुरुवातीच्या पुस्तकांपासून.. कथा.. गोष्टी.. कादंब-या आणि आता हे काय? म्हणून त्याने पुस्तक पाहिली, तर फॅशनची काही पुस्तकं, काही नाटकांची पुस्तकं.. काही त्याचा मित्र अरुणची मासिकं बघून तो चक्रावलाच. ही कधी आणली हिने? मी तर नाही आणून दिली? त्याला आठवलं, काल-परवा तर लक्ष्मीने पुस्तकाच्या मुखपृष्ठाचाही विषय काढला होता. अरुणच्या ओळखीने पुस्तकाचं मुखपृष्ठ म्हणून आपला फोटो छापावा म्हणून हट्टही केलेला. पण हे अतीच जरा, म्हणून त्याने पुस्तकांवरची धूळ झटकलीच. तिने लगेचच नारायणसाठी जेवण आणलं, तरी त्याची नजर तिच्यावरच खिळलेली. त्याने विचारलंच, ही नवीन पुस्तकं कुठून आणली? अहो, काही मी घेतली आणि काही अरुण भावजींनी पाठवलीत. नवीन पुस्तकासाठी यावेळी मुखपृष्ठासाठी बोलणं पण झालंय माझं. आज, उद्या वेळ मिळेल तेव्हा फोटोग्राफरला पाठवून फोटो काढून घ्यायला सांगितलाय त्यांनी. पुढच्या मासिकाच्या मुखपृष्ठावर माझा फोटो असेल. ती आनंदली. तिचं बोलणं ऐकून तो मात्र भांबावलाच.

हे कधी ठरलं? कुणी ठरवलं? लक्ष्मी आता इतकी ठामपणे बोलू लागलीय की, तिच्यात एवढा आत्मविश्वास कुणी निर्माण केला? अगदी चार भिंतीत वावरणारी लक्ष्मी आज मासिकाच्या मुखपृष्ठावर आपला फोटो छापून यावा म्हणून धडपडू लागलीय. तिचा निर्णय तिने एकटीने घेतलाय तोही मला न सांगता? काय झालं? तिचा प्रश्न काही नाहीफ त्याने जेवणाचं ताट घेतलं आणि एक-दोन घास खाऊनच तो उठला. ती काही बोलणार, पण त्याचं दुर्लक्ष. तो लगबगीने बाहेर गेला. तिला कळेना.. पण नंतर काही समजल्यागत ती गालात हसली. बहुधा अरू भावजींकडेच गेलेत. पुस्तकाच्या मुखपृष्ठासाठीचं बोलणं, दुसरं काही नाही. किती मनावर घेतलंय यांनी. तिला आठवलं, नारायणने तिला आणून दिलेली पुस्तकं आणि वाचनाची लागलेली गोडी. अगदीच इयत्ता पाचवी शिकलेल्या आपल्यासारख्या बाईला आजवर पुस्तकातून किती गोष्टी कळत गेल्या. अनेक गोष्टींचं ज्ञान मिळालं, स्वप्न, वास्तवाची ठळकता स्पष्ट झाली. यामध्ये मन गुंतून अनेक पट उलगडत गेले. कधी विनोद तर कधी गांभीर्याचा सूर लागला. तर, कधी जीवनातील वास्तवाचं अंग उमगलं. हे सारं आपल्या पतीमुळे.. नारायणचं हे रूप तिच्या अंतरी ठसलं.

नारायण बाहेर गेला, तसा काही वेळाने घरी आला. तिने हसून म्हटलं, झालं समाधान! हो! त्याचं उत्तर. इतक्यात दरवाजावर टकटक. बाहेर कुणी आलंय बहुधा, ती समजून गेली. अरू भावजी किंवा फोटोग्राफर असणार. मनातून ती भारावली. केसांचा अंबाडा नीट करून आरशासमोर धावली, तर बाहेर कसलाच आवाज तिचं मन विषण्ण करणारा. तिने आवंढा गिळला. दरवाजापाशी येऊन तिची नजर स्थिरावली. पाहिलं तर नारायण मांडणी, कपाटातील सारी पुस्तकं जमिनीवर टाकत, आपटत राहिलेला आणि समोर बसलेला रद्दीवाला तराजूत पुस्तकं किलोच्या भावात तोलत राहिलेला. तिचे डोळे भरून आले. समोरून काही दिसेनासं झालं, पण काही वेळाने बाहेरून येणारा काही पुस्तकांच्या ज्वाळांचा धूरही डोळ्यांना झोंबलाच. नारायणचं हे विक्षिप्त वागणं तिला खटकणारंच! तिच्या कल्पनेच्या पलीकडचंच. ती मूकपणे न्याहाळत राहिली सारं. तिला उमगलं, आजवर या पुस्तकातून मिळवलेलं ज्ञान हे चार भिंतीतच अडकून राहणार होतं. मनाच्या पुस्तकात गच्च मिटून राहणार होतं. त्यातील संदर्भ, आशय, नात्यांचं गुज सारं काही त्या पुस्तकातच मिटून राहणार होतं. ना त्याला वाव मिळणार होता.. ना त्याला नाव मिळणार होतं!

# खासगी शाळांचा अतिरेक

शाळा हे अध्ययनाचे ठिकाण. गुरुविणा विद्या नाही, असे म्हटले ते खरे आहे आणि आपण घरी कितीही शिकविले आणि खासगी क्लासेस घेतले, तरी शाळा हे मुलांच्या भवितव्यासाठीचे एक दालन आहे. एक ज्ञानमंदिर आहे. पण, याच ज्ञानमंदिरांमध्ये आता बेजाबदारपणा आणि शिक्षणापेक्षा आर्थिक व्यवहाराचे ठिकाण झालेले दिसते. पूर्वीच्या शिक्षणाच्या पद्धती बदलल्या आणि सारेच बदलले. महानगरपालिका आणि जि. प. च्या शाळांमधली पटसंख्या घसरली आणि यातच खासगी शाळांचे पेव आले. मनमानीपणा वाढला. विविध विषयांच्या पदव्यांसाठीचे डोनेशन, फी यासाठी वारेमाप पैशाची मागणी होऊ लागली.

खासगी शाळांवर शिक्षण विभागाचा वचक राहिलेला नाही. नुकतेच पुणे येथील एमआयटी शाळेचे प्रकरण आपण पाहतोय. मुलांनी, मुलींनी काय घालावे, काय नको हे शाळा ठरवणार? ड्रेसकोड असावा, शिस्त असावी, नियम, अटी असाव्यात, पण आपण तालिबानमध्ये राहतोय, असे नको ते जाचक आणि लांच्छनास्पद नियम? शिक्षण विभाग फक्त चौकशी करणार, अहवाल येणार.. मग ठरवणार. शाळांचा मनमानी कारभार मुलांनी, पालकांनी का सहन करावा? डोनेशनच्या नावाखाली अनेक शाळा मोठे आर्थिक व्यवहार करतात. फी वरही नियंत्रण नसते. ठरलेल्या ठिकाणाहून वह्या, पुस्तके, कपडे घ्यायचे. हे सारे पालकांच्या फायद्यासाठी असले तरी, त्याला दुप्पट रक्कम मोजावी लागते. मुळातच शाळा या खासगीकरणाने व्यापल्यामुळे शिक्षणाचा दर्जा घसरलाय. शिक्षक आणि मुले यांच्यातले अंतर कमी झालेय. आदर्श शिक्षक ग्रामीण भागात दिसतात, पण शहरी भागात कशाचा कशाला ताळमेळच नाही. आपण शिकवलेलं मुलांना समजतंय की, नाही हे पाहण्याचा दृष्टिकोन आता संपलाय. पालकांनी शिक्षकांशी बोलायचे, तर तेही ठरलेल्या दिवसात.

शिक्षण झपाट्याने बदलतेय. व्यवसायिक शिक्षण, माहिती तंत्रज्ञान याआधारेच आता शिक्षण आहे, मात्र मुलांच्या बुद्धिमत्तेचा विचारही व्हायला हवा. शाळा प्रशासनाने शिक्षण नेमणूक करताना, मुलांच्या योग्यतेचा विचार करून नियुक्ती केली पाहिजे. अनेक शाळांमध्ये दरवर्षी शिक्षक बदलतात. एका शाळेतून अनुभव घेऊन दुस-या शाळेत जातात, कारण कमी पगारात नियुक्ती होते ते परवडत नाही. मग मुलांना शिक्षकांशी संवाद फार कमी होतो.

परीक्षा काळात मुलांना समजून सांगणे, समजावून घेणे फार महत्त्वाचे असते. मुलांशी आपुलकीने प्रेमाने वागले, तर मुलांनाही शिक्षणाची आवड निर्माण होते. आज अनेक उच्चशिक्षित पदवी घेऊन बाहेर पडताहेत, पण नोकरीचा यक्ष प्रश्न निर्माण झालाय. विविध पदव्या घेतलेले सुशिक्षित मिळेल ती नोकरी करण्यास तयार आहेत. मेडिकल सारख्या अॅडमिशनसाठी लाखो रुपये भरून पुढे काय, हा प्रश्न तर उरतोच. सांगायचा मुद्दा हा की, खासगी शाळांवर सरकारचा अंकुश असणे फार गरजेचे आहे. त्यांची फी, नियम, यावर नियंत्रण नसेल, तर काळाच्या ओघात शिक्षणाचा बाजार मांडला जाईल आणि पदव्या विकत घ्याव्या लागतील, ही परिस्थिती निर्माण व्हायला वेळ लागणार नाही.

# सोहळ्यात मी न्हाहले

आमच्या घराशेजारच्यांनी मला बोलावल्याचा निरोप आला. म्हणून मी गेले त्यांच्या वरच्या हॉलमध्ये मला त्या घेऊन गेल्या आणि मला काही बोलताच येईना, तुम्ही जरा जाऊन हॉल उघडा, मी सामान घेऊन येते म्हटल्याने मी कडी काढली आणि थक्कच झाले.

माझा मुलगा सून, नातू, भावंडे असे सगळे जवळचे नातलग आत होते. हॉल पूर्ण सजवला होता. समोरच्याच भिंतीवर माझ नाव आणि फुलांनी ६१चा अंक तयार केला होता. सारं मला सुखद धक्का देणार आणि सर्वांच्या चेह-यावरचा आनंद सारं काही मला मी स्वप्नात नाहीना, असं विचार करायला लावणारं होतं. मी खरंच खूप भारावून गेले. सर्वकष आनंदाचा हा माझ्या आयुष्यातील पहिलाच भारावलेला प्रसंग.

मी प्रवेश करताच सर्वांनी टाळ्या वाजवल्या आपली आश्चर्याचा धक्का देण्याची कल्पना पार पडली. याचा आनंद माझ्या माणसांना झालेला तर सर्व जाणिवा गोठून गेलेली मी. मी आले तोवर माझ्या पाठोपाठ सर्वांमध्ये सामील असूनही घरातून मी येईपर्यंत निर्विकार राहिलेले माझे पती आले. सर्वांनी माझं औक्षण केलं सारे काही आनंदाचे सोहळे पार पडले.

माझा साठ वर्षाचा जीवनप्रवास हे सर्व आज आठवताना क्षणक्षण आठवतो आहे. एका खेडेगावात माझा जन्म अत्यंत गरीब घरात झाला. माझ्या आत्याला मूल नव्हतं. ती मला मी खूप बाळ असताना घेऊन गेली. मला तीच माझी आई माहीत झालेली. त्यामुळे ती माझी आई अशीच बाकीची नाती होत गेली. मी माध्यमिक शाळेत जाण्याच्या सुमारास माझी आई गेली. तोपर्यंत मला एक भाऊ झाला होता, तो खूप लहान होता. वडिलांची अत्यंत दुर्गम ठिकाणी शिक्षकाची नोकरी होती, त्याठिकाणी ते आम्हाला दोघांना घेऊन राहू शकत नव्हते आणि आम्ही दोघांनी राहण्याचा तो काळ आणि तशी परिस्थिती नसल्याने आम्हाला एका मावशीकडे रहावं लागलं. मी एसएससीची परीक्षा दिली आणि माझं लग्न झालं. मी मोठ्या शहरात राहायला आले. शहर मोठं आणि ज्या घरात आले तेही कुटुंब मोठं, त्यामुळे ठिकाण आणि घर तेथील माणसं सा-यांनीच मी भांबावले होते. परिस्थितीने आणि आलेल्या प्रसंगातून मी तोंड बंद ठेवून कसं राहायचं शिकले होते. पडेल किंवा कोणी सांगेल ते मी काम करत राहिले. व्यवहार, चाली-रीती सर्व काही शिकण्याचं आणि घरातील माणसांची मर्जी सांभाळणे हा माझा अभ्यासक्रम खूप वर्ष राहिला. मला आता कधी मागे वळून आयुष्याकडे पाहताना आणि आत्ताच्या मुलामुलींचे संसार पाहताना मनात येतं, माझं लग्न लवकर झालं आणि मला माझी अशी स्वत:ची मतं काहीच पुसटशीसुद्धा नसल्याने, मी त्या-त्या वेळी कोणी सांगेल ते शिकत गेल्याने आयुष्य शिकले. घरकामाबरोबर उरलेल्या वेळात काम म्हणून आणि संसाराला हातभार म्हणून मी भरतकाम करून देण्याचा पर्याय निवडला आणि कामाला लागले. पोस्टाची आरडी जमा करण्याचं काम स्वीकारलं. माझ्यासाठी मी दुचाकी शिकून घेतली. या सगळ्यासाठी मला माझ्या पतीने मोलाची साथ दिली आणि त्यामुळेच मला माझं जीवन घडवता आलं. नाहीतर मी शिक्षण, आर्थिक, सामाजिक सर्वच बाबतीत मागास होते. माझ्या लग्नानंतर मी माझ्या भावाला, वडिलांना माझ्या नवीन कुटुंबात सामावून घेऊ शकले. माझ्या सर्व एकत्रित असलेल्या कुटुंबाची मी कायम मनातून ऋणी राहिले. जे काम करायचं ते मनापासून, श्रमाने आणि निरपेक्षपणे या भावनांचं माझ्या आयुष्यात भांडवल खूपच फायदेशीर राहील. मला दोन मुलगे झाले. आता मी स्वतंत्र संसार सुरू केला. आत्तापर्यंत आमचं म्हणून एक घरकुल तयार झालं होतं. मुलगेही छान शिकले आणि आर्थिकदृष्ट्या रांगेला लागले. मोठा मुलगा परदेशी गेला




आता तो सहकुटुंब तेथे राहतो. त्याने घरात मात्र संपर्क अजिबात कमी केला नाही. दोनही सुना माझ्या मुली म्हणून राहतात. माझ्या मोठ्या सुनेला अत्यंत गरज असल्याने, काही कारणांनी मला ऑस्ट्रेलियाला एकटीने जावं लागलं आणि मनात भीती ठेवून का असेना, तिची गरज म्हणून मी तिथे जाऊन पोहोचले सुद्धा. मला आता कधीच एकटेपणा जाणवत नाही, लहानपणापासून मी एकटी असणारी आता माझं कुटुंब माझ्यासकट नऊजणांचं झालं आहे. माझ्यासाठी ते नवरसांच परिपूर्ण रसात्मक आहे. हे पूर्णत्व मला लाभलं यातच मी खूश आहे. मी शहरात राहिल्याने माझ्या नात्याने संबंधित जे नातेवाईक शिक्षण, नोकरी संदर्भात आले त्यांना या शहरात रुजण्यासाठी आवश्यक ती मदत करण्यासाठी माझ्या पूर्ण कुटुंबाने सहकार्य केलं. त्यामुळे इथे रुजलेल्या नातलगांना माझं घर आधारघर राहील. देवाच्या दयेने आणि घरातील सर्वांच्या परोपकारी स्वभावाने मला कोणालाही आवश्यक ती मदत करता आली. अगदी कोणी माझ्या कोकणातून आरोग्याची दोरी बळकट करण्यासाठी उपचारासाठी हॉस्पिटलला आले असतील, तरीही त्यांच्यासाठी लागणारी सोय करणे हे प्रत्येकाने मुख्यत: माझ्या पतीने त्याची जबाबदारी स्वीकारून ते काम आपलसं केलं.

आज मला आर्थिक स्थिरता तर आली आहेच. माझ्या जन्माने मी कोणीच नसलेल्या आणि सुरुवातीची काही वर्ष खडतर गेलेल्या मला काहीच अपेक्षा आणि काहीच ध्येय न नेमून दिल्याने परमेश्वराने मला जे आज दिलं आहे, मी जी काही आज आहे तो माझा मला स्वर्ग वाटत आहे. आज माझ्या साठ वर्ष पूर्ण होणा-या आयुष्याकडून मला सर्व काही मिळालं आहे. नातं हे जन्मानं काय, यापेक्षा आपल्या जीवनात कसे जगतो, किती प्रेमाने जगतो, तशी नाती तयार होऊन ती आपल्याबरोबर जगतात. आपल्याला आनंद आजच्यासारखा देण्याला झटतात आणि कमकुवत वेळेला आधार द्यायला बरोबर असतात. हे जीवनातलं सत्य जगून पटलं आहे. मी आज माझ्या आयुष्याकडून माझ्या माणसांकडून पूर्ण समाधानी आहे. आज सर्वांनी माझ्या साजरा करत असलेल्या सोहळ्यात मी अक्षरश: न्हाऊन निघाले आहे.

# ऑस्ट्रियामध्ये स्पंज सिटी तयार होत आहे

जगभरातील शहरांनी हवामान बदलाचे धोके ओळखले आहेत आणि त्यांचा सामना करण्यासाठी उपाययोजनांवर काम करत आहेत. कारण बहुतांश शहरे हवामानाचा प्रकोप सहन करण्यासाठी तयार केलेली नाहीत. काँक्रीटपासून बनवलेल्या इमारती केवळ उष्णतेची लाट वाढवतात. याशिवाय पावसाचे पाणी जमिनीत मुरत नाही, अशा पद्धतीने या इमारती आणि शहरे बांधण्यात आली आहेत.या चुकीचा परिणाम म्हणून गेल्या काही महिन्यांत युरोपातील काही देशांना विनाशकारी वादळे आणि पुराचा सामना करावा लागला आहे.अशा आपत्ती टाळण्यासाठी ऑस्ट्रियामध्ये असे शहर तयार केले जात आहे, जे महापूआणि हवामानाची तीव्रता सहन करण्यास सक्षम असेल.



व्हिएन्नाच्या शेजारी असलेल्या ॲमसीबोजेनमध्ये बनवलेल्या या स्पंज सिटीफ्तील झाडं पाहून वाटतं की ती एखाद्या योद्धयासारखी शहरे जमिनीत सतत पाणी वाहत राहण्यासाठी गुरुत्वाकर्षणाच्या शक्तीचा वापर करतील. जेणेकरून हे पाणी तलावात साठवता येईल.सोप्या भाषेत सांगायचे तर, ही स्पंज शहरे ही नैसर्गिक जलचक्राची प्रतिकृती बनवतील. ऑस्ट्रेलियाच्या युनिव्हर्सिटी ऑफ ॲडलेड लँडस्केप आर्किटेक्चर अँड अर्बन डिझाईन प्रोग्रामचे संचालक स्कॉट हॉकेन याबाबत म्हणतात की, ही संकल्पना पाण्याशी हुशारीने काम करण्याची आहे, जेणेकरून पूर कमी धोकादायक होईल. गेल्या दशकभरात स्पंज सिटीचे अनेक घटक जगभरातील मेट्रो शहरांमध्ये समाविष्ट केले गेले आहेत. चीनने २०१३ मध्ये कोंजियन यांची कल्पना स्वीकारली. तेथे ३० शहरांमध्ये या संकल्पनेची चाचणी करण्यात यश आले आहे. त्यामुळे सन २०३० पर्यंत ८० टक्के शहरी भाग या चौकटीत साचेबद्ध करण्याचे नियोजन आहे. कोपनहेगन येथील वेस्टरब्रोच्या एका उद्यानात पृष्ठभागाच्या खाली तलावांमध्ये मोठ्या प्रमाणावर पावसाचे पाणी साठवले गेले आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# बायकोमुळे लाडक्या बहिणींशी या सुपरस्टारने धरलेला अबोला, लग्नात समोर आलेला गृहकलह

**मुंबई-** बॉलिवूड अभिनेता संजय दत्तचे आयुष्य एखाद्या चित्रपटाच्या कथेसारखेच आहे. त्याचे वैयक्तिक आयुष्य त्याच्या करियरच्या सुरुवातीपासून नेहमीच चर्चेत राहिले आहे - ड्रग्ज, तुरुंग, तीन लग्ने आणि बहिणींशी बिघडलेले संबंध.... अशा बऱ्याच गोष्टी चर्चेत होत्या. असे अनेकदा म्हटले जाते की मान्यताशी लग्न केल्यानंतर त्याच्या आणि त्याच्या बहिणींसोबतच्या नात्यात दुरावा निर्माण झाला होता. पण एकदा संजय दत्तने स्वतःच आपल्या सख्ख्या बहिणींच्या वागण्यावर नाराजी व्यक्त केली. संजय दत्त चे त्याच्या बहिणी प्रिया आणि नम्रता यांच्यावर खूप प्रेम आहे, विशेषतः प्रिया दत्तने कठीण काळात त्याला खूप साथ दिली. संजय दत्त तुरुंगात असताना, प्रिया त्याला वारंवार भेटायला जायच्या.जेव्हा संजय दत्तने मान्यताशी तिसरे लग्न केले. तेव्हा संजयचे बहिणीसोबतच्या नात्यात ताण यायला सुरुवात झाली. त्याच्या लग्नाला किंवा वाढदिवसाला बहिणी उपस्थित नव्हत्या. एका मुलाखतीत संजय दत्तला




याबद्दल विचारले असता, तो थोडा नाराज दिसत होता.काही वर्षांपूर्वी संजय दत्त आप की अदालत मध्ये पाहुणा म्हणून आला होता. तेव्हा त्याला विचारण्यात आले की त्याने त्याच्या बहिणींना त्याच्या लग्नाला आमंत्रित केले नाही का. यावर संजय दत्तने स्पष्ट केले की त्याने दोन्ही बहिणींना आमंत्रित केले होते, पण त्या आल्या नाहीत आणि ही त्यांची इच्छा होती. अनेक अहवालांमध्ये असा दावा करण्यात आला होता की संजयच्या बहिणी त्याच्या आणि मान्यताच्या लग्नावर खूश नव्हत्या.संजय दत्तने त्याच्या बहिणींबद्दल काय म्हटले? जेव्हा संजय दत्तला विचारले गेले की त्याच्या बहिणी लग्नाच्या वर्धापनदिनानिमित्तही का आल्या नाहीत, तेव्हा तो म्हणाला, ही त्यांची इच्छा होती. मी त्यांना आमंत्रित केले होते.

मी मोठ्या भावासारखे सर्व काही केले. मला त्यांनी यावे असे वाटत होते, पणतुरुंगात असताना बहिणीच्या संघर्षाबद्दल संजय म्हणाला, भाऊ आणि बहिणीचे नाते असे आहे की जर मी माझ्या बहिणींसाठी काही करत असेल तर तो माझा अधिकार आहे. पण मला ते प्रसिद्ध करायला आवडणार नाही. बहिणी लग्नाला उपस्थित न राहिल्याबद्दल संजय म्हणाला, त्या लहान बहिणी आहेत, म्हणून मी त्यांचा आदर करायला हवा होता. पण त्यांच्या स्वतःच्या आवडी आहेत. प्रत्येक कुटुंबात भांडणे आणि मतभेद होत असतात. प्रियाबद्दल बोलताना तो म्हणाला, प्रिया सर्वात लहान आहे. जर तिने चूक केली असेल तर मी तिला मोठा भाऊ म्हणून माफ केले आहे. मला फक्त तिने जादूची मिठी द्यावी असे वाटते. संजय दत्तच्या बहिणी नेहमीच या संपूर्ण प्रकरणात मौन बाळगून राहिल्या. नम्रता आणि प्रिया कधीही त्यांच्या रागाचे कारण स्पष्टपणे सांगत नव्हत्या. नंतर हळूहळू सर्व काही ठीक झाले आणि आज संजय दत्तचे त्याच्या बहिणींशी आणि त्यांच्या मुलांशी खूप चांगले संबंध आहेत. तो अनेकदा एकत्र वेळ घालवताना दिसतो

## अन्नपूर्णा आहे नम्रता संभेराव! उपाशी टीमसाठी ढाब्याच्या किचनमध्ये शिरली अन्... नेमकं काय घडलं?

**मुंबईः** महाराष्ट्राची हास्यजत्रा या कार्यक्रमातील कलाकारांचे अनेक किस्से सोशल मीडियावर चर्चेत येतात. अनेकदा हे कलाकार स्वतःहून इन्स्टाग्रामवर काही रंजक अपडेट शेअर करतात. अलीकडेच प्रसाद खांडेकरनेही नम्रता संभेरावचे कौतुक करणारा एक खास व्हिडिओ शेअर केला. सांगलीच्या प्रयोगानंतर नेमकं काय घडलं, हे सांगणाऱ्या या व्हिडिओवर चाहत्यांनीही असंख्य कमेंट करत नम्रताचे कौतुक केले. या शोच्या माध्यमातून यामधील प्रेक्षकांचे मनोरंजन तर करतातच, पण याशिवाय हे सर्व कलाकार नाटक, सिनेमा, वेब सीरिज अशा विविध प्रोजेक्टमध्येही व्यग्र आहेत. अभिनेता प्रसाद खांडेकरच्या थेट तुमच्या घरातून या नाटकाचे प्रयोग सध्या सुर असून, त्याने या नाटकाचे लेखन आणि दिग्दर्शन केले आहे. थेट तुमच्या घरातून मध्ये प्रसाद मुख्य भूमिका साकारत असून त्याच्यासह भाग्यश्री मिलिंद, ओंकार राऊत, भक्ती देसाई, प्रथमेश शिवलकर आणि नम्रता संभेरावही या नाटकात आहेत. या नाटकाचा अलीकडेच एक प्रयोग सांगलीमधील विष्णुदास भावे नाट्यमंदिरात पार पडला.सांगलीमधील प्रयोगाला जाताना ही सर्व कलाकार मंडळी शॉपिंगमध्ये रमली होती. त्यामुळे त्यांना जेवणाच्या वेळेत एखाद्या हॉटेलमध्ये पोहोचता आलं नाही. कारण जेवणाची वेळ निघून गेल्याने अनेक हॉटेल्समधील आचारी उपलब्ध नव्हते. तेव्हा नम्रताने काय केलं, हे सांगणारा व्हिडिओ प्रसादने शेअर केला आहे.प्रसादने असे सांगितले की,



अन्नपूर्णा नम्रता. सांगलीला प्रयोगाला जाताना शॉपिंगमुळे थोडा उशीर झाला आणि जेवणाचे वांदे झाले... जवळ जवळ सगळ्या हॉटेलसमधील शेफ लंच टाईम होऊन गेल्यामुळे निघून गेलेले. शेवटी एका ढाब्यावर मालकाची परमिशन घेऊन आमच्या नमाने थेट किचनचा ताबा घेतला. त्याने शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये दिसते आहे की, सर्व मंडळी जेवणाची वाट पाहतायंत आणि नम्रता ढाब्याच्या स्वयंपाकघरात जेवणाची तयारी करते आहे. नम्रता या व्हिडिओत असं सांगतेय की, ती झुणका बनवतेय. शेफ नसल्याने ती हॉटेलच्या किचनमध्ये घुसली आणि झुणका बनवते आहे.नम्रताच्या अभिनयाचं कौतुक करणाऱ्या चाहत्यांनी यावेळी तिच्यामध्ये एक सुगरण दडली आहे, याचंही कौतुक केलं. तिला नेटकऱ्यांनी सर्वगुणसंपन्न म्हटले आहे.

## सावत्र मुलीविरोधात ५० कोटींच्या मानहानीचा खटला! रुपाली गांगुलीची कोर्टात साक्ष, अनुपमाचे गंभीर आरोप

**मुंबई-** अनुपमा मालिकेतली लोकप्रिय टीव्ही अभिनेत्री रूपाली गांगुली आणि तिची सावत्र मुलगी ईशा वर्मा यांच्यातील वाद बरेचदा चर्चेत असतो. गेल्या वर्षी नोव्हेंबर २०२४ मध्ये रूपालीने सावत्र मुलगी ईशा वर्माविरुद्ध मानहानीचा खटला दाखल केला होता. हा खटला दोन भागात विभागलेला आहे, एक दिवाणी मानहानीचा खटला आहे, जो उच्च न्यायालयात आहे आणि दुसरा फौजदारी मानहानीचा खटला आहे, जो अंधेरी न्यायालयात सुरू आहे. आता या प्रकरणांमध्ये रूपाली गांगुलीच्या वकिलाने नवीन माहिती दिली आहे.

ताज्या अपडेटनुसार, काही दिवसांपूर्वी रुपाली गांगुली तिच्या वकील सना रईस खानसोबत मुंबईतील अंधेरी न्यायालयात गेली होती. न्यायालयाबाहेर माध्यमांशी बोलताना, बिग बॉस १७ मध्ये दिसलेली सना म्हणाली, ङ्क्षङ्क्षतुम्हाला माहिती आहेच की, आम्ही उच्च न्यायालयात दिवाणी मानहानीचा खटला दाखल केला आहे, तिथे आम्हाला अंतरिम दिलासा मिळाला आहे. इथे फौजदारी मानहानीची तक्रार दाखल करण्यात आली होती, त्यासाठी रुपाली देखील आज आली.ङ्क्षङ्क्षसनाने पुढे सांगितले की, ङ्क्षङ्क्षरुपाली यांनी न्यायालयात तिचे म्हणणे मांडले आणि तिला कसा धक्कादायक अनुभव आला आहे हे सविस्तरपणे सांगितले. तिला कसे बदनाम करण्यात आले आहे आणि तिची प्रतिमा जाणूनबुजून खराब करण्यात आली आहे... तिने हे सर्व न्यायालयात मांडले.ङ्क्षङ्क्ष आपल्या दमदार अभिनयासाठी ओळखल्या जाणारी रुपाली गांगुली म्हणते की या वादामुळे तिला मानसिक त्रास झालाच पण त्यासोबतच तिच्या सार्वजनिक प्रतिमेवरही परिणाम झाला आहे.सध्या, रूपाली स्टार प्लसच्या सुपरहिट शो अनुपमा मध्ये मुख्य भूमिका साकारत आहे. प्रेक्षकांना या मालिकेतील तिची भूमिका खूप आवडते. त्यामुळे ती नेहमीच टीआरपी चार्टमध्ये अव्वल स्थानावर असते.

# स्वातंत्र्यदिनी बुलढाण्यात ऑपरेशन सिंदुर सन्मान महारक्तदान शिबिर

जनसंचलन/बुलढाणा

राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि देशी-विदेशी लिकर असोसिएशन, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या १५ ऑगस्ट २०२५ रोजी ऑपरेशन सिंदुर सन्मान महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर सहकार विद्यामंदिर हॉल, बुलडाणा येथे सकाळी ९.३० ते ५ या वेळेत होणार आहे. या रक्तदान शिबिरात बुलढाणावासियांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून रक्तदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. रक्तसंकलनाची जबाबदारी शासकीय रक्तपेढी बुलढाणा, शेगाव, खामगाव, लिलावती रक्तपेढी बुलढाणा, जनकल्याण रक्तपेढी नांदुरा, दत्ताजी भाले रक्तपेढी छत्रपती संभाजीनगर, आणि डॉ. हेडगेवार रक्तपेढी अकोला या संस्थांकडे असेल. कार्यक्रमास जिल्ह्याचे मान्यवर अधिकारी उपस्थित राहणार असून, जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, तसेच इतर वरिष्ठ अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व संस्था प्रतिनिधी उपस्थित राहणार असून नागरिकांनी




समाजसेवेचा संदेश देत महारक्तदान शिबिरात सहभागी व्हावे, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक डॉ. पराग नवलकर यांनी केले आहे.

# संत चोखासागर प्रकल्पात ८४.४५ टक्के जलसाठा!

## प्रकल्पाचे ३ वक्र दार उघडले, नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा!



जनसंचलन/ देऊळगाव राजा

जिल्ह्यातील संत चोखासागर अर्थात खडकपूर्णा हा मोठा प्रकल्प दमदार पावसाने ओव्हर फ्लो होण्याच्या मार्गावर असून प्रकल्पात ८४.४५ टक्के जलसाठा उपलब्ध झाला आहे. त्यामुळे प्रकल्पाची ३ वक्रद्वारे १० सेमीने उघडण्यात आली. दरम्यान नदीकाठच्या ३३ गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पाणीपुरवठा योजनेसाठी महत्वपूर्ण असलेल्या संत चोखासागर प्रकल्प क्षेत्रात ९ व १० ऑगस्ट रोजी दमदार पाऊस झाला.त्यामुळे प्रकल्प ओव्हरफ्लो होण्याच्या मार्गावर असून,सध्या प्रकल्पात ८४.४५ टक्के एवढा जलसाठा उपलब्ध झाला आहे. प्रकल्पाचा संकल्पित जलसाठा ९३.४० दलघमि तर पूर्ण संचय पातळी ५२०. ५० मीटर आहे.प्रकल्पात सद्यस्थितीत ५२९ मीटर जलाशय पातळी असून, ७८.८८ दलघमि जलसाठा उपलब्ध आहे.दरम्यान प्रकल्पातील पाणी नदीकडच्या गावामध्ये शिरकाव करू शकते.त्यामुळे प्रकल्पाचे ३ वक्रद्वार उघडण्यात आले आहे.प्रकल्पात पाण्याची होणारी आवक पाहता विसर्ग कमी अथवा जास्त करण्याची कार्यवाही नियंत्रण कक्षाकडून केली जात आहे. दरम्यान नदीकाठच्या निमगाव गुरु, सावंगी टेकाळे, डिग्रस बु., डिग्रस खूर्द,टाकरखेड वायाळ, टाकरखेड भागीले, निमगाव वायाळ,साठेगाव, हिवरखेड, राहेरी खूर्द, तडेगाव, राहेरी ब्रु., ताडशिवणी, देवखेड, पिंपळगाव कुंडा, लिंगा, खापरखेडा, रायगाव, सावरगाव तेली आदी गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

# अन्न व औषध प्रशासनामार्फत सणासुदीच्या पार्श्वभूमीवर विशेष तपासणी मोहीम...

जनसंचलन/बुलडाणा



सणासुदीच्या पार्श्वभूमीवर राज्यभर सण महाराष्ट्राचा, संकल्प अन्न सुरक्षेचा या टॅगलाईनखाली अन्न व औषध प्रशासनामार्फत विशेष तपासणी मोहीम सुरू झाली आहे. अन्न व औषध प्रशासन मंत्री ना. नरहरी झिरवाळ यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांच्या निर्देशानुसार आज बुलढाण्यात मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. उद्घाटनाच्या दिवशी श्री गणेश बिग्गाजी बिकानेर स्वीट मार्ट, जुना अजीसपुर रोड, सागवण, बुलढाणा येथे तपासणी करून वैध अन्न परवाना नसल्याचे आढळले. संबंधित आस्थापनास परवाना मिळेपर्यंत व्यवसाय बंद करण्याची नोटीस देण्यात आली आहे. यावेळी सहाय्यक आयुक्त(अन्न) पी. एस. पाटील, पोलीस उपाधीक्षक (गृह) बी. डी. पावरा, सहकार अधिकारी एम. ए. पोले, अन्नसुरक्षा अधिकारी नि. म. नवलकार व जी. के. वसावे तसेच पोलीस कॉन्स्टेबल शिवाजी मोरे उपस्थित होते. अन्न व्यवसाय चालकांना वैध परवाना घेणे, स्वच्छतेचे नियम काटेकोरपणे पाळणे, ताज्या व परवानाधारक विक्रेत्याकडूनच कच्चा माल घेणे, दुग्धजन्य पदार्थ ४ पेक्षा कमी तापमानात साठवणे आणि जुना किंवा खराब खवा/मावा टाळणे यासारख्या महत्त्वाच्या सूचना विशेष तपासणी मोहिमेदरम्यान देण्यात आल्या. सणासुदीत नागरिकांना शुद्ध, सुरक्षित व दर्जेदार अन्नपदार्थ पुरवावेत, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाने सर्व अन्न व्यवसाय चालकांना केले. तसेच नियमाचे पालन न करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल, असे प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

# जिल्हा रुग्णालयातील दिव्यांग तपासणी शिबीर १५ ऑगस्ट रोजी रद्द

जनसंचलन/बुलडाणा

जिल्हा रुग्णालय, बुलडाणा येथे नियमितपणे प्रत्येक शुक्रवारी नेत्र, मतिमंद/मनोरुग्ण आणि कान-नाक-घसा संबंधी दिव्यांग तपासणी बोर्ड कार्यरत असतो. मात्र येत्या १५ ऑगस्ट २०२५ रोजी (तिसरा शुक्रवार) स्वातंत्र्य दिनानिमित्त शासकीय सुटी असल्यामुळे नियोजित तपासणी शिबीर रद्द करण्यात आले आहे. रुग्णालय प्रशासनाने नागरिकांना विनंती केली आहे की, या दिवशी संबंधित तपासणीसाठी रुग्णालयात येऊ नये. अन्यथा झालेल्या गैरसोयीस प्रशासन जबाबदार राहणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.



# रक्षाबंधनच्या भेटीत एसपींचा दीदींना महिला सुरक्षिततेचा वादा!

**जनसंचलन/बुलढाणा**

कर्तव्यदक्ष जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांचा दरारा पाहता, गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत. एसपी निलेश तांबे जेवढे गुन्हेगारांसाठी कठोर आहेत तेवढे जनतेसाठी भावनिक सुद्धा आहेत.खाकी वर्दीतील माणूस मनाने कठोर असते असे नाही त्यांनाही मन आहे..भावना आहेत. म्हणूनच ते कायदा व सुव्यवस्था राखतात. ९ ऑगस्ट ला महसूल मंत्री बावनकुळे आल्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांना रक्षाबंधनाचा सण साजरा करता आला नाही मात्र शासकिय अध्यापक महाविद्यालय बुलढाणा (बी.एड.) येथील विद्यार्थीनींनी रक्षाबंधन सणाचे औचीत्य साधून, पोलीस अधीक्षक कार्यालय बुलढाणा येथे भेट दिली. पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांना राखी बांधून रक्षाबंधन सण साजरा केला. यावेळी एसपी निलेश तांबे यांनी उपस्थितीत विद्यार्थीनी तथा भावी शिक्षीका यांचे सोबत सुसंवाद साधून, त्यांना बुलढाणा जिल्हा पोलीस दलाकडून राबविण्यात येत असलेल्या विवीध लोकोपयोगी, महिला सुरक्षा संबंधीत उपक्रमाची माहिती दिली. सध्या तक्रार नोंदविण्याठी पर्याय उपलब्ध असून त्यामध्ये पो.स्टे.ला येऊन तक्रार देणे, ऑनलाईन तक्रार नोंदविणे याच बरोबर हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार नोंदविणे बाबत मार्गदर्शन केले. या प्रसंगी, नागरीकांसाठी डायल ११२, महिलांसाठी- दामिनी पथक, भरोसा सेल, पोलीसकाका पोलीस दिदी, अमानवीय वाहतूक प्रतिबंधक कक्ष, महिला व बाल अत्याचार प्रतिबंध शालेय तक्रार पेटी, युवकांसाठी अंमली पदार्थ सेवन प्रतिबंध मोहिम अशा मोहिमा व उपक्रम जिल्हा पोलीस दलाकडून राबविण्यात येत असल्याची माहिती दिली. या रक्षाबंधन सण सोहळ्याचे वेळी पोनि सुनिल अंबूलकर प्रभारी अधिकारी स्था.गु.शा. बुलढाणा, प्रा.डॉ. एस.आर. खडसे शासकिय अध्यापक महाविद्यालय बुलढाणा, सपोनि. डी. डी. ढोमणे वाचक पो.अ. बुलढाणा, पोहेकॉ. मनिषा जाधव, पोकॉ. आनंद शिंदे, पोकॉ. अमोल अंभोरे-पोलीस



अधीक्षक कार्यालय बुलढाणा, शासकिय अध्यापक महाविद्यालयाच्या विद्यार्थीनी कविता मोहिते, भक्ती पवार, अंजली पांडे, साक्षी निर्मळ, योगेश्वर तांभारे, ऋतुजा चव्हाण, नूतन शिंगणे, वैष्णवी डुकरे, आकांशा वाघमारे, वैष्णवी पारस्कर, श्रुती चऱ्हाटे, स्नेहल मिरगे, चंचल सित्रे, शिवगंगा सोळंके आणि कार्यालयीन स्टाफ हर्षवर्धन इंगळे शासकिय अध्यापक महाविद्यालय,

# क्रांतिकारीचे पदाधिकारी अधिकाऱ्यांना घेऊन पोहोचले बांधावर!

## तातडीने पंचनामे करून नुसकान भरपाई देण्याची मागणी!

**जनसंचलन/ चिखली**

चिखली तालुक्यात काल ९ ऑगस्ट ला ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. पावसाने अक्षरशः थैमान घातल्याने नदी नाल्यांनी मार्ग बदलून प्रवाह केल्याने शेती आणि पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांवर अतिवृष्टीचे मोठे संकट ओढावले आहे. त्यामुळे क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी कृषि सहाय्यक व तलाठी यांना सोबत घेऊन शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली. झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे नेते रामेश्वर अंभोरे यांनी केली आहे.

गेले काही वर्षापासून अतिवृष्टी, नापिकी यामुळे शेतकरी संकटात आहेत. यावर्षी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात खर्च करून पेरणी करावी लागली. बँकेचे कर्ज घेऊन,दाग दागिने ठेवून पेरणीचा खर्च करावा लागला. सोयाबीन, कापूस, तुर, उडीद, मका या पिकांची लागवड चिखली तालुक्यात केलेली आहे. दरम्यान काल चिखली तालुक्यात पावसाने प्रचंड मोठे थैमान घातले. शेतजमिनी खरडून गेल्या, पिके वाहून गेली तर काही ठिकाणी शेतांचे तलाव तयार झाले आहेत. या पावसाने शेतकऱ्यांचे उभे पीक मोठ्या प्रमाणात पाण्यात बुडाल्याने खुप मोठ्या प्रमाणात नुसकान होऊन मोठी हानी झाली आहे. पावसाच्या या प्रकोपामुळे पांढरदेव, वरखेड, भोरसा भोरशी, सावंगी गवळी,नायगाव बु, मंगरूळ नवघरे, घानमोड मानमोड, अंबाशी, खैरव अशा अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पावसामुळे शाळेमध्ये पाणी शिरले, घरात पाणी शिरले, जनावरांच्या गोठ्याचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अनेकांच्या घरातील अन्न धान्य, घरातील साहित्य - कपडे खराब झाले असून अनेक गावांमध्ये विजेच्या तारा तुटून मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी कृषी विभागातील अधिकाऱ्यांना सोबत घेऊन थेट बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली. तसेच बाधित गावातील नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून नुसकान भरपाई द्यावी अशी मागणी केली. यावेळी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे रामेश्वर अंभोरे, हेमंत शेजोळ, गणेश शेजोळ, अशोक शेजोळ, नंदूभाऊ पांचाळ,विनोद हांडे,संतोष आकाळ, योगेश आकाळ, नागेश आकाळ , संदीप ढोरे ,तलाठी वराडे साहेब, कृषि सहाय्यक डुकरे पाटील मॅडम यासह शेतकरी उपस्थित होते.

# स्किल ॲक्युपंक्चर कॉलेज बुलडाणा मधून रुग्ण सेवेसाठी तयार होणार ॲक्युपंक्चर थेरपिस्ट



**जनसंचलन/ बुलढाणा**

जूनमध्ये झालेल्या डिप्लोमा इन ॲक्युपंक्चर थेरपी अभ्यासक्रमाचे प्रथम सेमिस्टर परीक्षेत स्किल ॲक्युपंक्चर कॉलेज बुलडाणा येथील विद्यार्थांनी उज्वल यश संपादन केले आहे.या परीक्षेत महिका संदीप खारकर हिने ७९.६० % गुण मिळवत प्रथम स्थान पटकावले.द्वितीय क्रमांक चंदन रवींद्र राणे यांना मिळाला असून ,त्यांना ७९% गुण प्राप्त झाले आहेत. पियुष अनिल दुसाने ७६.४०% गुण तृतीय क्रमांक पटकावला आहे.कॉलेजचे अध्यक्ष डॉ.सचिन सुपे ,सचिव प्रा.जयश्री पाटील, डॉ. छाया कंकाळ डायरेक्टरस्किल ॲबॅकसक्रियेटीव्ह प्रा.लि. ,प्राचार्य डॉ.प्रशांत सावंत, प्रा.चैताली पाटील स्किल पॅरामेडिकल कॉलेज ,विभाग प्रमुख कु.कोमल लटके, प्रा. डॉ संजय सोनोने,प्राडॉ,उमेश साळवे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थांचे कॉलेजच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. तुमच्या मेहनतीचा उत्तम परिपाक मिळाला.व भविष्यात ॲक्युपंक्चर थेरपिस्ट यांच्या हातून उत्तम रुग्ण सेवा घडावी हीच सदिछ्या व सर्वांचे मनापासून अभिनंदन !उज्जल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा संस्थेचे अध्यक्ष डॉ सचिन सुपे यांनी दिल्या.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८